## प्रकरण **14** वे

### रूग्णालयातून दिलेल्या विशेष सवलती व परवानग्या

- याचा मुख्य उद्देश गरीब गरजू रूग्णाना उपचारासाठी आर्थिक मदत पुरविणे आहे.
- गरजेनुसार या निधीतून खर्च केले जातात या निधीचे कोणतेही ठराविक लक्ष ठरविलेले नाही.
- दारिद रेषेखालील असलेल्या रूग्णांनाच फक्त या उपक्रमातून मदत केली जाते. स. का. पाटील महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालयाच्या वैद्यकिय अधिकाऱयानेच पूर्णपणे तपासणीपेपर लिहून घेतली पाहिजेत.
- ही सोय उपलब्ध करून घेण्यासाठी रूग्णांनी साध्या कागदावर तपासणीपेपरची छायांकित प्रतिसह समाज विकास अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा त्यानंतर समाज विकास अधिकाऱयाकडून रूग्णाची व त्याच्या नातेवाईकाची मुलाखत घेतली जाते व त्याचा अहवाल अभिप्रायासह मंजूरीसाठी प्रमुख वैद्यकिय अधिकाऱयाकडे सादर केला जातो या सर्व गोष्टीला फक्त 1 दिवस लागतो व रूग्णाला लागणारी औषधाची खरेदी रूग्णालय प्रशासना कडून केली जाते व यग्णाला दिली जातात.
- खाजगी प्रयोग शाळेतून केल्या गेलेल्या चाचण्यांचे बील त्या प्रयोगशाळेला अदा केले जाते.
- बृहनमुंबई महानगरपालिकेल्या हद्दी बाहेर रस्त्यानी 24 तासाच्या आत मयत घेवून जायचे असल्यास रूग्णालय तशी परवानगी देते.